Reg. No. : SAN / WVA / RSR / CR-130 / 1992-93 / 1992

# श्री दत्त नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित उरुण-ईश्वरपूर (जि. सांगली)

सि.स.नं. ४३७ ब, कचरे गल्ली, आण्णासाहेब डांगे चौक, उरुण-ईश्वरपूर,
ता. वाळवा, जि. सांगली - ४१५ ४०९ (०२३४२) २२२१९४




३५ वा

## वार्षिक अहवाल

२०२५-२६

ऑडिट वर्ग २०२५ - २०२६

'अ'

'सहकार भूषण'

महाराष्ट्र शासनाचा 'सहकार भूषण' पुरस्कार प्राप्त संस्था

# श्री दत्त नागरी सह. पतसंस्था मर्या; उरुण-ईश्वरपूर, जि. सांगली

## संचालक मंडळ



मा.प्रा.डॉ. श्रीकांत भानुदास चव्हाण
चेअरमन



मा. बी. टी. निकम
व्हा. चेअरमन



मा. प्राचार्य डॉ. पी. बी. कुलकर्णी
संस्थापक चेअरमन / संचालक



मा. दिनेश हसबनीस
संचालक



मा. सुमंत कुलकर्णी
संचालक



मा. अमित कुलकर्णी
संचालक
दि. ३१/०७/२०२५ पर्यंत



मा. श्रीमती सुनिता कुलकर्णी
संचालिका
दि. ३१/०७/२०२५ पर्यंत



मा. सौ. सुखदा महाजन
संचालिका



मा. दिलीप फल्ले
संचालक



मा. सोमाजी कोळेकर
संचालक



मा. सुभाष खिलारे
संचालक



मा. सुमंत महाजन
स्वीकृत तज्ञ संचालक



मा. उदय डफळापूरकर (सी.ए.)
स्वीकृत तज्ञ संचालक



मा. महेश कबाडे
कार्यलक्षी संचालक



मा. संजय विभुते
सहाय्यक कार्यलक्षी संचालक

# श्री दत्त नागरी सह. पतसंस्था मर्या; उरुण-ईश्वरपूर, जि. सांगली

## ऑ फि स र



श्री. नितीन दत्तात्रय सपाटे
सिनिअर ऑफिसर



श्री. विजय नानासो पाटील
सिनिअर ऑफिसर



श्री. सत्यजित दत्तात्रय झेंडे
सिनिअर ऑफिसर/ई.डी.पी. मॅनेजर



श्री. शशिकांत कृष्णात पिसे
सिनिअर ऑफिसर



श्री. सोमनाथ मोहन वाळवेकर
ज्युनिअर ऑफिसर



सौ. मुमताज आयुब संदे
ज्युनिअर ऑफिसर



श्री. दीपक जगन्नाथ साळवी
ज्युनिअर ऑफिसर



श्री. सिध्देश्वर ज्ञानेश्वर शेंडगे
ज्युनिअर ऑफिसर



कु. भारती ज्ञानदेव खंडागळे
ज्युनिअर ऑफिसर



श्री. संजय रामचंद्र विभुते
ज्युनिअर ऑफिसर



श्री. सोनुसिंग आत्माराम थोरावडे
ज्युनिअर ऑफिसर



सौ. वारणा कुमार टिंगरे
ज्युनिअर ऑफिसर



श्री. अशोक बाबुराव शिंदे
ज्युनिअर ऑफिसर

# श्री दत्त नागरी सह. पतसंस्था मर्या; उरुण-ईश्वरपूर, जि. सांगली

## कर्मचारी वर्ग


सौ. आसावरी सचिन जिरगे
सिनिअर क्लार्क


श्री. राजेंद्रकुमार शंकरराव पाटील
सिनिअर क्लार्क


श्री. गणेश तुकाराम पाटील
सिनिअर क्लार्क


श्री. केदार चंद्रकांत पोतदार
सिनिअर क्लार्क


श्री. जगदीश शिवाजी गायकवाड
सिनिअर क्लार्क


श्री. दत्तात्रय आनंदा पाटील
सिनिअर क्लार्क


श्री. प्रदीप चंद्रकांत फार्णे
सिनिअर क्लार्क


श्री. शंकर सयाजी सुर्यवंशी
ज्युनिअर क्लार्क


श्री. अवधुत विश्वनाथ पालकर
ज्युनिअर क्लार्क


सौ. श्वेता श्रीकांत जाधव
ज्युनिअर क्लार्क


श्री. प्रशांत प्रदीप माळवदे
ज्युनिअर क्लार्क


श्री. विनायक बापू पाटील
ज्युनिअर क्लार्क


श्री. संदीप विलासराव भोजुगडे
ज्युनिअर क्लार्क


सौ. मयुरी निलेश सुर्यवंशी
ज्युनिअर क्लार्क

## शिपाई वर्ग


श्री. प्रदीप श्रीपती ताटे
नाईक


श्री. संजय वसंतराव भक्ते
शिपाई


श्री. विनोद यशवंत तिके
शिपाई


श्री. विशाल विलास पाटील
शिपाई


श्री. साहिल राजेंद्र जठार
शिपाई

स्थापना : २ मे १९९२ रजि.नं.:एस.ए.एन./डब्ल्यू.व्ही.ए./आर.एस.आर./सी.आर.-१३०/९२-९३/१९९२

# श्री दत्त नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित उरुण-ईश्वरपूर

## ३५ वी अधिमंडळाची सर्वसाधारण सभा

### नोटीस

(फक्त सभासदांकरिता)

सन्माननीय सभासद बंधू भगिनी, स.न.वि.वि.

श्री दत्त नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित.,उरुण-ईश्वरपूर या संस्थेची पस्तिसावी अधिमंडळाची सर्वसाधारण सभा **रविवार, दिनांक ३०/०८/२०२६ रोजी दुपारी ठीक ३.०० वाजता लोकनेते राजारामबापू सेमिनार हॉल, श्रीमती कुसुमताई राजाराम पाटील कन्या महाविद्यालय, शिराळा नाका परिसर, उरुण-ईश्वरपूर येथे** आयोजित केली आहे. तरी सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे ही विनंती.

## सभेपुढील विषय

१. दि. २४/०८/२०२५ रोजीच्या अधिमंडळाची सर्वसाधारण सभेचे प्रोसिडिंग वाचून कायम करणे.
२. दि. ३१/०३/२०२६ अखेर संपलेल्या वर्षाचे ताळेबंद, नफा-तोटा पत्रक यास मान्यता देणे.
३. मा. संचालक मंडळाने शिफारस केलेल्या सन २०२५-२०२६ च्या नफा विभागणीस मान्यता देणे.
४. सन २०२५-२०२६ च्या अंदाजपत्रकापेक्षा जादा झालेल्या खर्चास मंजुरी देणे.
५. सन २०२६-२०२७ सालाकरिता संचालक मंडळाने सुचविलेल्या अंदाजपत्रकास मान्यता देणे.
६. सन २०२५-२०२६ वर्षाच्या वैधानिक लेखापरिक्षण अहवालाची नोंद घेणे.
७. सन २०२५-२०२६ वैधानिक लेखापरिक्षण अहवालाचा दोष दुरुस्ती अहवाल सादर करणेबाबत संचालक मंडळास अधिकार देणे.
८. सन २०२६-२०२७ सालाकरिता वैधानिक लेखापरिक्षकाची नियुक्ती करणे व त्यांचा मेहेनताना ठरविणे.
९. सन २०२४-२०२५ या वर्षाच्या लेखापरिक्षण अहवालावर संचालक मंडळाने तयार केलेला दोष दुरुस्ती अहवाल रजिस्टार यांचेकडे सादर केलेला आहे याची सभेत नोंद घेणे.
१०. मा. संचालक मंडळ व त्यांच्या नातेवाईकांना दिलेल्या कर्जाची सभेत नोंद घेणे.
११. मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी दिलेली सुधारित आदर्श उपविधी दुरुस्तीसह स्वीकारणे.
१२. शाखा शिराळा नूतन इमारत बांधकामाबाबत आढावा घेणे.
१३. कार्यलक्षी संचालक व सेवक यांचे पगार स्केल ठरविणे व या पदासाठी जास्तीत जास्त वयाची मर्यादा ठरविणे याबाबतचे अधिकार संचालक मंडळास देणेबाबत विचार विनिमय करणे.
१४. थकीत कर्ज वसुलीबाबत संचालक मंडळाने केलेल्या व करावयाच्या कार्यवाहीबाबत चर्चा करणे.
१५. मा. अध्यक्षांच्या परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयावर चर्चा करणे.

**उरुण-ईश्वरपूर**
**दिनांक : १०/०८/२०२६**

**संचालक मंडळाचे आदेशावरुन,**
**महेश यशवंत कबाडे**
**(एम.कॉम.,जी.डी.सी.ॲन्ड ए.)**
**कार्यलक्षी संचालक**

## विशेष सूचना

१. अधिमंडळाची सर्वसाधारण सभेपुढे ज्या सभासदांना प्रश्न विचारावयाचे असतील त्यांनी आपले प्रश्न लेखी स्वरुपात दिनांक २७/०८/२०२६ पूर्वी संस्थेच्या कार्यालयीन वेळेत आणून द्यावेत.
२. कोरम अभावी सभा तहकूब झाल्यास त्याच दिवशी त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर ती सभा घेतली जाईल.
३. अहवालाची प्रत सभेस येताना बरोबर आणावी.
४. सन २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठीचा संपूर्ण अहवाल पतसंस्थेच्या www.dattapatsansthaislampur.in येथे उपलब्ध आहे.
५. सभासदांनी मागणी केल्यास आपल्या संस्थेच्या नजिकच्या शाखेत अहवाल मिळेल.
६. ज्या सभासदांनी के.वाय.सी. पूर्तता अद्याप केली नाही त्यांनी कृपया ती पूर्ण करावी.
७. सुधारित उपविधीची प्रत मुख्यालय व सर्व शाखा येथे उपलब्ध आहेत.

## विद्यमान संचालक मंडळ

| अ.नं. | नांव | शैक्षणिक पात्रता | हुद्दा |
|---|---|---|---|
| १ | मा. प्रा.डॉ. श्रीकांत भानुदास चव्हाण | एम.ए.,पीएच.डी. | चेअरमन |
| २ | मा. भिमराव तुकाराम निकम | एच.एस.सी. | व्हा.चेअरमन |
| ३ | मा. प्राचार्य डॉ. प्रकाश बळवंत कुलकर्णी | एम.ए.,पीएच.डी. | संस्थापक-चेअरमन/संचालक |
| ४ | मा. दिनेश दामोदर हसबनीस | बी.ए. | संचालक |
| ५ | मा. सुमंत प्रकाश कुलकर्णी | एच.एस.सी. | संचालक |
| ६ | मा. अमित गजानन कुलकर्णी<br>दिनांक ३१/०७/२०२५ पर्यंत | बी.कॉम.,डी.सी.एच.एन.,सी.सी.एन.ए. | संचालक |
| ७ | मा. श्रीमती सुनिता गजानन कुलकर्णी<br>दिनांक ३१/०७/२०२५ पर्यंत | एम.कॉम.,डी.सी.ओ. | संचालिका |
| ८ | मा. सौ. सुखदा सुमंत महाजन | बी.ए.(इकॉनॉमिक्स) | संचालिका |
| ९ | मा. दिलीप शिवलिंग फल्ले | बी.कॉम. | संचालक |
| १० | मा. सोमाजी साधू कोळेकर | एच.एस.सी. | संचालक |
| ११ | मा. सुभाष मारुती खिलारे | आर्ट टिचर डिप्लोमा | संचालक |
| १२ | मा. सुमंत दिगंबर महाजन | एम.कॉम. | स्वीकृत तज्ञ संचालक |
| १३ | मा. यु.जी. डफळापूरकर | चार्टर्ड अकौंटंटस् | स्वीकृत तज्ञ संचालक |
| १४ | मा. महेश यशवंत कबाडे | एम.कॉम.,जी.डी.सी.ॲन्ड ए. | कार्यलक्षी संचालक |

**कार्यलक्षी संचालक**
मा. महेश यशवंत कबाडे
एम.कॉम.,जी.डी.सी.ॲन्ड ए.

**वैधानिक लेखापरिक्षक**
मा. आर.एस.काळे ॲन्ड कंपनी
कॉस्ट अकौंटंटस्, सांगली

**कायदेशीर सल्लागार**
मा. ॲड. सुरजसिंग तुळसीदास परदेशी
मा. ॲड. अभिजीत विश्वेश्वर परमणे
मा. ॲड. भूषण भालचंद्र देशपांडे
मा. ॲड. सतिश एन. चौगुले
मा. ॲड. कु.कविताबेन शेटे
मा. ॲड. सौ.अश्विनी सुतार
मा. ॲड. सौ.संजना यादव
मा. ॲड. योगेश सुखदेव माळी

## बँकर्स

- सांगली जिल्हा मध्यवर्ती बँक
- सांगली अर्बन को-ऑप.बँक
- राजारामबापू सहकारी बँक
- पलूस सहकारी बँक
- भारती सहकारी बँक लि. पुणे
- सारस्वत को-ऑप. बँक
- दि कराड अर्बन बँक
- डोंबिवली नागरी बँक
- आय.सी.आय.सी.आय.बँक
- सांगली जिल्हा प्राथमिक शिक्षक सहकारी बँक
- अपना सहकारी बँक
- भारतीय स्टेट बँक
- बँक ऑफ इंडिया
- युनियन बँक ऑफ इंडिया
- दि आष्टा पिपल्स सहकारी बँक लि.,आष्टा

## भावपूर्ण

# श्रध्दांजली

अहवाल सालात आपल्या संस्थेचे
सभासद, हितचिंतक, स्त्री-पुरुष, बंधू-भगिनी,
तसेच देशाच्या विविध भागात
नक्षलवाद्यांनी केलेल्या हल्ल्यात मयत झालेले बांधव,
देशाच्या सीमेचे रक्षण करताना हुतात्मा झालेले जवान,
थोर नेते, शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ, लेखक, साहित्यिक, शिक्षणतज्ञ, बॅकिंग व
पतसंस्था क्षेत्रातील व्यक्ती, कलावंत, सामाजिक कार्यकर्ते, सभासद,
ठेवीदार, ज्ञात व अज्ञात व्यक्ती मयत झालेल्या आहेत. त्या सर्वांच्या कुटुंबियांच्या
दुःखात पतसंस्था सहभागी होत असून
मृत व्यक्तिंच्या स्मृतीस मी आपले सर्वांचेवतीने
भावपूर्ण विनम्र श्रध्दांजली अर्पण करतो.
त्यांच्या आत्म्यास सद्गती मिळो हीच परमेश्वर चरणी प्रार्थना....!

# श्री दत्त नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित
# उरुण-ईश्वरपूर

## सन २०२५ -२०२६ चा अहवाल

सन्माननीय सभासद बंधू भगिनींनो,

सस्नेह नमस्कार,

पस्तिसाव्या अधिमंडळाची सर्वसाधारण सभेच्या निमित्ताने आपणांशी हितगुज करण्याची आणि आपण ठेवलेल्या विश्वासास पात्र राहून मी व माझ्या संचालक मंडळ सदस्यांनी आणि कर्मचारी वर्गानी पतसंस्थेच्या केलेल्या प्रगतीचा लेखाजोखा आपणांसमोर ठेवण्याची संधी मला प्राप्त होते याचा मला मनस्वी आनंद होत आहे.

आपल्या संस्थेच्या सन २०२५-२६ वर्षासाठीच्या पस्तिसाव्या अधिमंडळाच्या सर्वसाधारण सभेत ज्या आस्थेने, प्रेमाने आणि अगत्यपूर्वक आपण सर्वजण उपस्थित राहण्याच्या आनंदमयी प्रसंगी मी व्यक्तिश: व संचालक मंडळाच्यावतीने आपले मन:पूर्वक सहर्ष व सस्नेह स्वागत करीत आहे. संस्थेने गेल्या ३४ वर्षात आपल्या सहकार्याने लक्षणीय प्रगती केली आहे. संस्थेने आर्थिक वर्षात हाती घेतलेल्या परिवर्तनाच्या पुढील वाटचालीमध्ये संस्थेने सभासद, खातेदार, कर्मचारी, धनवर्धिनी एजंट यांच्या दृष्टीने एक नव्या युगाची सुरुवात होण्यासाठी लक्षणीय प्रगती करुन संस्थेस संख्यात्मक बळकटी आणली. हेड ऑफिस, शाखा ईश्वरपूर, शाखा शिराळा, शाखा औदुंबर, शाखा सागाव असा चार शाखा विस्तार झालेला आहे. हेड ऑफिस, शाखा ईश्वरपूर स्व:मालकीच्या इमारतीमध्ये चालू आहे. शाखा शिराळासाठी मध्यवर्ती ठिकाणी जागा व इमारत खरेदी केली आहे आणि दिमाखदार व सर्व सोयींनी सुसज्ज अशा इमारतीमध्ये स्थलांतरीत होणार आहे. संस्थेकडे उत्कृष्ट, कुशल धोरण आखणारे संस्थापक, चेअरमन व संचालक मंडळ तसेच सेवाभावी कर्मचारी वर्ग या सर्वांच्या कार्यपध्दतीमुळे पतसंस्थेच्या प्रगतीची घोडदौड सुरु आहे. आपले पतसंस्थेवरील प्रेम, विश्वास आणि आपुलकी याच जोरावर पतसंस्था मार्गक्रमण करीत आहे. पतसंस्थेने सर्वांच्या सहकार्याने व आशीर्वादाने सर्व सोयींनीयुक्त अशा ग्राहक सेवा उपलब्ध करुन दिल्या असून यामध्ये महा पॉवर पे वॉलेटच्या माध्यमातून विज बील स्वीकारणे, वॉटर ए.टी.एम., एन.ई.एफ.टी., आर.टी.जी.एस., एस.एम.एस.सुविधा, मोबाईल ॲप व मोबाईल बँकिंग यासारख्या अत्त्याधुनिक सुविधा उपलब्ध केलेल्या आहेत. पतसंस्थेच्या प्रधान कार्यालय येथे स्वतंत्र हिरकणी कक्ष देखील स्थापन करण्यात आला आहे. संस्थेचे सभासद, ठेवीदार, कर्जदार व आपल्या सर्वांच्या सहकार्याने सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षात पतसंस्थेने केलेल्या प्रगतीचा अहवाल, वैधानिक लेखापरिक्षकांनी प्रमाणित केलेला ताळेबंद व नफा-तोटा पत्रक सर्व सन्माननीय सभासदांसमोर सादर करताना मला आनंद होत आहे.

सन २०२५-२०२६ या सालातील संस्थेच्या प्रगतीचा अहवाल आपणासमोर मा. संचालक मंडळाच्यावतीने सादर करताना मला अतिशय आनंद होत आहे. वसूल भागभांडवल, एकूण ठेवी, एकूण कर्जे यामध्ये भरघोस वाढ झाली आहेच. संस्थेच्या एकूण आर्थिक व्यवहारात आपण सर्वांनी दिलेल्या मन:पूर्वक योगदानामुळे विक्रमी वाढ झालेली आहे.

## सभासद (Shareholders) :

संस्थेची प्रगती ही सभासदांच्या मार्गदर्शनावर, व्यवहारावरच अवलंबून आहे. आपल्या पतसंस्थेचे कार्यक्षेत्र सांगली, सातारा व कोल्हापूर जिल्हा असून सर्व सभासद हे कार्यक्षेत्रातीलच आहेत. पतसंस्थेशी कोणत्याही स्वरुपाचे व्यवहार करणाऱ्या व्यक्तिंना सभासद करुन घेऊन संस्थेच्या विविध योजना व सेवा पुरविण्याचे काम केलेले आहे. सभासदांना आर्थिक सक्षम बनविण्यासाठी पतसंस्था कटीबध्द आहे. दिनांक ३१ मार्च २०२५ रोजी सभासद संख्या ९६१० इतकी होती. अहवाल सालात ७३२ नवीन सभासद झाले असून, मयत व अन्य वैयक्तिक कारणांमुळे १०० सभासद कमी झालेले आहेत. अहवाल साल अखेरीस कार्यक्षेत्रातील ३१ मार्च, २०२६ अखेर एकूण सभासद संख्या १०२४२ इतकी आहे. ही वाढ ६.५८% इतकी आहे.

## भागभांडवल (Share Capital) :

संस्थेने स्वनिधी वाढीसाठी अधिकृत भागभांडवलाची मर्यादा १० कोटी केली आहे. गतवर्षी भागभांडवल रु.६,३१,२९,७००/- इतके होते. त्यामध्ये रु.३६,३८,१००/- वाढ होऊन आर्थिक वर्षाअखेर ( ३१ मार्च २०२६ ) वसूल भागभांडवल रु.६,६७,६७,८००/- इतके आहे. भागभांडवल वाढीचा वेग ५.७६% इतका आहे. शासनाच्या धोरणानुसार पतसंस्थेत व्यवहार करणाऱ्या व्यक्तिस सभासद करणेचे धोरण, दरवर्षी पतसंस्थेने राबविलेले कर्ज विषयक धोरण आणि कर्ज रकमेशी लिंकिंग करावयाची भागभांडवल रक्कम यामुळे वसुल भागभांडवलामध्ये वाढ झालेली आहे. सदर वसुल भागभांडवल वाढीचा वेग हा पतसंस्थेची भक्कम आर्थिक स्थिती दर्शवित आहे.

## भांडवल पर्याप्तता (CRAR) :

रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार व महाराष्ट्र शासन, सहकार आयुक्त व निबंधक कार्यालय, पुणे यांचे दिनांक २३/०८/२०२२ चे परिपत्रकानुसार सी.आर.ए.आर. (Capital to Risk Weighted Assets Ratio - CRAR) ही संकल्पना अस्तित्त्वात आली. भांडवल पर्याप्तता प्रमाण कमीत कमी ९% असणे आवश्यक आहे. आपल्या पतसंस्थेचे ३१ मार्च, २०२६ रोजी भांडवल पर्याप्तता प्रमाण (CRAR) १८.२३% इतके आहे. आपल्या पतसंस्थेचे हे प्रमाण अत्यंत चांगले असलेने पतसंस्थेचा आर्थिक पाया भक्कम आहे. यापुढेही भांडवल पर्याप्तता वाढीचा वेग कायम ठेवण्याचा आणि वाढविण्याचा प्रयत्न केला जाईल.

## संचालक मंडळ सभा (Meetings of the Board of Directors) :

सहकार खात्याच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार आणि आदर्श उपविधीनुसार संचालक मंडळ व उपसमित्यांच्या सभा घेण्यात आलेल्या आहेत. संचालक मंडळाने व उपसमिती सदस्यांनी अभ्यासपूर्ण चर्चा करुन सभासद व पतसंस्थेच्या प्रगतीसाठी हिताचे निर्णय घेऊन विविध धोरणांची व योजनांची अंमलबजावणी करण्यात आलेली आहे. पतसंस्थेच्या प्रगतीसाठी सकारात्मक, प्रोत्साहनपर निर्णय एकमताने मंजूर केल्याने पतसंस्थेच्या कामकाजात पारदर्शकता दिसून येते. व्यवस्थापन, वसुली आढावा, योग्य कर्ज वितरण व पतसंस्था वाढीसाठी आवश्यक असणारे निर्णय इत्यादी बाबी विविध सभा या माध्यमातून पूर्ण केलेल्या आहेत. अहवाल सालात संचालक मंडळ व उपसमित्यांच्या एकूण सभा झाल्या आहेत त्या पुढीलप्रमाणे...

| अ.नं. | तपशील | सभा संख्या |
|---|---|---|
| १ | संचालक मंडळ | १५ |
| २ | कर्ज वाटप व वसुली समिती ईश्वरपूर शाखा व औदुंबर शाखा १२, शिराळा शाखा व सागाव शाखा १२ | २४ |
| ३ | लेखापरिक्षण व गुंतवणूक समिती | ०४ |
| ४ | कायदेशीर सल्लागार समिती | ०४ |
| ५ | माहिती व तंत्रज्ञान समिती | ०४ |
| ६ | शिराळा शाखा बांधकाम समिती | ०३ |
| | एकूण | ५४ |

## स्वनिधी (Own Funds) :

३१ मार्च, २०२५ अखेर स्वनिधी रु.१३०१.०७ लाख इतका होता. दरवर्षी यामध्ये सतत वाढ होत आहे. अहवाल सालातही स्वनिधीमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. दिनांक ३१ मार्च २०२६ अखेर संस्थेकडे रु.१४०३.४९ लाख इतका स्वनिधी आहे. स्वनिधीतील वाढ ७.८७% इतकी आहे.

## राखीव निधी व इतर निधी (Reserve Funds Other Reserve) :

पतसंस्थेची सुरक्षितता व स्थैर्य हे राखीव निधी व इतर निधीवर अवलंबून असते. पतसंस्थेचा पाया भक्कम होणेसाठी भागभांडवला बरोबरच राखीव निधी व इतर निधीची पुरेशी तरतूद असणे तितकेच महत्त्वाचे आहे. अहवाल सालात सुरुवातीस राखीव निधी व इतर निधी रु.१२,३७,८०,४११/-इतका होता. त्यामध्ये रु.१,३५,०३,५९८/- इतकी वाढ होऊन वर्षाअखेरीस रु.१३,७२,८४,००९/- इतका झाला आहे. राखीव निधी व इतर निधीचा वाढीचा वेग १०.९१% इतका आहे.

## श्री दत्त नागरी सहकारी पतसंस्था - एक दृष्टीक्षेप

### संस्थेची गतवर्षाची तुलनात्मक सांख्यिकीय परिस्थिती

| अ.नं. | तपशील | ३१ मार्च २०२५ | ३१ मार्च २०२६ |
|---|---|---|---|
| १ | एकूण सभासद | ९,६१० | १०,२४२ |
| २ | वसूल भागभांडवल | ६,३१,२९,७०० | ६,६७,६७,८०० |
| ३ | गंगाजळी व इतर निधी | १२,३७,८०,४११ | १३,७२,८४,००९ |
| ४ | स्वनिधी | १३०१.०७ लाख | १४०३.४९ लाख |
| ५ | एकूण ठेवी | ११८,२९,६५,००३ | १२६,७४,९२,९९२ |
| ६ | एकूण येणे कर्ज | ८७,८१,७४,७०७ | ९२,९५,८५,८६४ |
| ७ | बँक गंतवणूक ( तरलतेपोटी ) | ३२,९०,०२,१७९ | ३५,६९,८७,५०९ |
| ८ | बँक गुंतवणूक ( इतर जादा गुंतवणूक ) | ९,८०,७६,७८३ | ११,२५,९४,७३० |
| ९ | सी.डी.रेशो | ६९.५६% | ६८.७२% |
| १० | इमारत निधी | ३,१३,८३,३४२ | ३,३३,८३,८४२ |
| ११ | नफा | १,७०,०२,२१० | १,९८,९०,४८२ |
| १२ | खेळते भांडवल | १४८,७१,५४,२९५ | १६०,१८,९८,८०३ |
| १३ | लाभांश | १२% | १२% प्रस्तावित |
| १४ | पतसंस्थेचा व्यवसाय (एकूण ठेवीएकूण कर्जे) | २०६,११,३९,७१० | २१९,७०,७८,८५६ |
| १५ | शेअर मुल्यांकन ( प्रती शेअर मूल्य ) | १५९.५४ | १६४.२७ |
| १६ | सी.आर.ए.आर. | १४.९५% | १८.२३% |
| १७ | प्रति कर्मचारी व्यवसाय | ५२८.५० लाख | ५१०.९५ लाख |
| १८ | लेखापरिक्षण वर्ग | अ | अ |
| १९ | कार्यक्षेत्र | संपूर्ण सांगली, सातारा, कोल्हापूर जिल्हा | |

## सामाजिक बांधिलकी (Social Responsibility) :

श्री दत्त पतसंस्था आपल्या सामाजिक उत्तरदायित्त्वाविषयी कटीबध्द आहे. पतसंस्थेच्या ३४ वर्षाच्या कालखंडात दरवर्षी एक सामाजिक कार्य याप्रमाणे आजवर एकूण ३४ सामाजिक कार्ये अविरतपणे आणि अखंडीतपणे केलेली आहेत. सामाजिक उन्नती बरोबरच शैक्षणिक उन्नती होण्याच्यादृष्टीने सामाजिक बांधिलकी म्हणून सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षात सामाजिक कार्यातील सहभाग म्हणून अपंग कल्याण शिक्षण संस्था संचलित, बधिर मुक विद्यालय, शिराळा ता. शिराळा, जि. सांगली या सामाजिक कार्य करणाऱ्या सेवाभावी संस्थेच्या बधिर मुक मुलांना दैनंदिन वापरासाठी लागणारे ग्रुप हिअरिंग करीता यु-टर्न टेबल तयार करुन दिले असून, याकरीता सामाजिक कार्यातंर्गत रक्कम रु.२५,०००/- इतकी आर्थिक मदत करण्यात आलेली आहे.

श्री दत्त नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित.,उरुण-ईश्वरपूर आणि महाराष्ट्र राज्य कृतिशील निवृत्त अधिकारी कर्मचारी संघटना., पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्रातील प्रसिध्द नाडी तपासणी तज्ञ डॉ. नजम अली कादरी (MD. Ayurveda & MD. Gynecology) यांचे मार्गदर्शनाखाली नाडी परिक्षण शिबीर दिनांक १४ व १५ एप्रिल, २०२५ रोजी पतसंस्थेच्या हेड ऑफिस-ईश्वरपूर येथे आयोजित करण्यात आले होते. या दोन दिवशीय नाडी परिक्षण शिबीरामध्ये९२ लाभार्थ्यांनी प्रत्यक्ष नाडी तपासणीचा व आयुर्वेदीक औषधांचा लाभ घेतला. नागरिकांच्या वयाच्या व स्वास्थ्याच्या दृष्टीकोनातून शरीरामध्ये घडत असलेल्या बाबींचे अचूक निदान होऊन त्यावर योग्य उपचार पध्दतीने औषधोपचार व सल्ला देणेत आला.

श्री दत्त नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित.,उरुण-ईश्वरपूर आणि डॉ.एस.एन.पाटील फौंडेशन, तुरुकवाडी, महाजन कन्सर्न्स, एच.पी.गॅस वितरक, शिराळा यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक १५ जून, २०२५ रोजी पतसंस्थेचा ३३ वा वर्धापन दिनाचे औचित्य साधून आरोग्य तपासणी शिबीर आयोजित करण्यात आले. यावेळी पतसंस्थेचे सभासद, सेवकवर्ग, धनवर्धिनी एजंट यांचे आरोग्य तपासणी व औषधोपचार मोफत करण्यात आले. यावेळी १६६ लाभार्थ्यांनी आरोग्य तपासणी शिबीराचा लाभ घेतला.

## ठेवी (Deposites) :

सर्वच स्तरातील उच्चांक गाठण्यासाठी पतसंस्थेकडे असलेली ठेवीची पुंजी ही महत्त्वाचा पाया मानला जातो. पतसंस्थेच्या एकूण प्रगतीमध्ये ठेव वाढीला अनन्यसाधारण महत्त्व आहे. पतसंस्थेचा विस्तार हा पतसंस्थेतील वाढणाऱ्या ठेवीवर अवलंबून असतो. या स्पर्धात्मक परिस्थितीतही वेळोवेळी इतर पतसंस्थांच्या ठेवीचे व्याजदराचे तुलनात्मक माहितीचा अभ्यास करुन ठेवीचे व्याजदर हे इतर पतसंस्थांच्या तुलनेत आकर्षक ठेवलेले आहेत. सुरक्षितता, द्रव्यसंचय, द्रव्यवृध्दी व विश्वासार्ह सेवा या चतु:सुत्रीचा योग्य वापर केलेने पतसंस्थेकडील ठेव वाढीस मदत झालेली आहे. बदलत्या आर्थिक क्षेत्रातील बदलांचा परिपूर्ण अभ्यास करुन पतसंस्थेने वेळोवेळी सादर केलेल्या ठेव योजनांना सभासद, ठेवीदार आणि ग्राहकांनी उत्स्फुर्त प्रतिसाद दिला, ठेव वाढीसाठी हातभार लावला. संस्थापक चेअरमन, संचालक मंडळ, सेवक वर्ग, धनवर्धिनी एजंट, पतसंस्थेवर विश्वास ठेवणारे ठेवीदार या सर्वांच्या प्रयत्नातून ठेव वाढ झालेली आहे. या सर्वांचे मी मन:पूर्वक अभिनंदन करतो आणि आभार मानतो. आम्ही ठेवीदारांचे ठेवीचे विश्वस्त आहोत. या भूमिकेतून ठेवीदारांचा विश्वास व विश्वासार्हता जपण्याचे प्रयत्न आम्ही सातत्याने करीत आहोत. ३१ मार्च, २०२५ रोजी पतसंस्थेकडे एकूण ठेवी रु.११८,२९,६५,००३/-इतक्या होत्या. या आर्थिक वर्षात यामध्ये रु.८,४५,२७,९८९/- इतकी वाढ होऊन ३१ मार्च २०२६ अखेर एकूण रु.१२६,७४,९२,९९२/- इतक्या ठेवी झालेल्या आहेत. गतवर्षीच्या तुलनेत अहवाल सालात ठेव वाढीचे प्रमाण ७.१४% इतके आहे. पतसंस्थेने १२५ कोटी ठेवीचा टप्पा पूर्ण केला आहे. आपल्या व आपल्या हितसंबंधीतांच्या ठेवी जास्तीत जास्त आपल्या पतसंस्थेत ठेवून पतसंस्थेच्या विकासात हातभार लावावा असे आवाहन मी यानिमित्ताने आपणास करीत आहे.

## कर्जे (Loans) :

ठेवीदारांनी मोठ्या विश्वासाने आपल्या पतसंस्थेत ठेवलेला पैसा कर्ज व्यवहारात गुंतविणे ही मोठी जोखीम असते. अर्थव्यवस्थेतील अस्थिरता, आर्थिक मंदी या बाबींबरोबरच आपण ठेवीदारांच्या ठेवींचे विश्वस्त आहोत.या भूमिकेतून कर्ज वितरण करताना आवश्यक ती आधुनिक बॅंकिंग पध्दतीचा वापर करुन नियोजनबध्द पध्दतीने कर्जे वितरीत केली आहेत. हे करीत असताना पतसंस्था क्षेत्रातील बदलती परिस्थिती, इतर पतसंस्थांचे कर्ज विषयक धोरण, व्याजदर इत्यादीचा सुक्ष्म अभ्यास करुन नाविन्यपूर्ण योजना सादर केल्या.

याबरोबरच तंत्रशुध्द छाननी, कर्जदार यांचा सिबील रिपोर्ट आणि पारदर्शक वितरण प्रणाली याचा विचार करुन कर्ज वाटप केलेले आहे. कर्ज वाटप करीत असताना पतसंस्थेने सहकार खात्याच्या नियमांचे काटेकोरपणे पालन करीत कर्ज वाटप केलेले आहे हे आवर्जून स्पष्ट करावे लागते. वर्षाअखेरीस पतसंस्थेचे एकूण येणे असलेल्या कर्जाचे एकूण ठेवींशी गुणोत्तर ( सी. डी. रेशो ) ६८.७२% असलेने पतसंस्थेने कर्ज वाटपाचे नियोजन अत्यंत सुसूत्रतेने केले आहे. ३१ मार्च २०२५ अखेर एकूण येणे कर्जे रु.८७,८१,७४,७०७/-इतके होते. यामध्ये रु.५,१४,११,१५७/- इतकी वाढ होऊन ३१ मार्च २०२६ अखेरीस एकूण येणे कर्जे रु.९२,९५,८५,८६४/- इतकी झालेली आहेत. गतवर्षीच्या तुलनेत अहवाल सालात कर्ज वाढीचे प्रमाण ५.८५% इतके आहे. पतसंस्थेने केलेल्या एकूण कर्ज वितरणापासून रु.१०६२.६८ लाख इतके व्याजाचे उत्पन्न मिळाले आहे. स्थावरतारण कर्जाचे नियमित कर्जदारांना रिबेट देण्याचे धोरण पतसंस्थेने राबविले आहे. कर्जदारांना विनंती करतो की, आपले कर्ज खाते दरमहा हप्ता भरुन नियमित ठेवावे. याचबरोबर पतसंस्थेने सोलर पॉवर कर्ज योजना ( सौर उर्जा कर्ज योजना) सुरु केलेली आहे. या कर्ज योजनेचा लाभ घेणेसाठी पतसंस्थेच्या नजीकच्या शाखेस भेट द्यावी हे देखील यानिमित्ताने आवर्जून सांगावयाचे आहे.

## कर्ज वसुली व थकबाकी (Overdue Recovary) :

सर्वच पतसंस्थांचे समोर वसुली करणे हे एक मोठे आव्हान निर्माण झाले आहे. थकबाकी ही पतसंस्थेच्या नफा क्षमतेवर परिणाम करणारी बाब आहे. कर्ज वसुली नियमित झाल्यास एन.पी.ए.चे प्रमाण मर्यादित राहीलेस पतसंस्थेची नफा क्षमता वाढते. पतसंस्थेने नेहमीच थकबाकी वसुलीस प्राधान्य दिले आहे. परंतु सर्वच पतसंस्थांना सद्यस्थितीत असणारा यक्ष प्रश्न म्हणजे थकबाकी व अनुत्पादित कर्जे. सहकार खात्याने एन.पी.ए.बाबत जे काही निकष दिले आहेत त्या निकषांचे पालन करीत आदर्श एन.पी.ए. व्यवस्थापनाचे दृष्टीने सुक्ष्म पातळीवर नियोजन करत पतसंस्थेने सर्व संचालक मंडळ, कार्यलक्षी संचालक, सहाय्यक कार्यलक्षी संचालक, ऑफिसर ते अगदी शिपाई यांचे पर्यंत सर्वांनी सक्रिय सहभाग घेवून नियोजन व सातत्यपूर्ण वसुली प्रक्रिया संपूर्ण वर्षभर राबविली आहे. सहकार खात्याने एन.पी.ए. संदर्भात १८० दिवसापेक्षा मुद्दल व येणेव्याज रक्कम विचारात घेवून खाते १८० दिवसापेक्षा जादा थकबाकी असणारी खाती एन.पी.ए. होणार आहेत. बाजारपेठेतील आर्थिक मंदीच्या परिस्थितीमुळे अपेक्षित थकबाकी वसुली झालेली नाही. परंतु काही कर्जदार थकबाकीदार यांनी वसुलीसाठी दाद न दिलेने नाईलाजास्तव कायदेशीर वसुली मार्गाचा अवलंब करावा लागला आहे. त्यामुळे ढोबळ एन.पी.ए. प्रमाण कमी होण्यास मदत होत आहे. थकबाकीदार कर्जदारांनी आपली कर्ज खाती नियमित ठेवल्यास पतसंस्थेची थकबाकी व एन.पी.ए. प्रमाण कमी होण्यास मदत होणार आहे. तरी सर्व कर्जदारांनी आपल्या कर्जाचे हप्ते दरमहा भरुन सहकार्य करावे असे आवाहन मी संचालक मंडळाचे वतीने करीत आहे.

## संचालक मंडळ व नातेवाईकांची कर्जे (Loans to Directors & Directors Relatives) :

महाराष्ट्र राज्य सहकारी कायदा १९६० च्या कलम ७५ (२) मधील तरतुदीनुसार संचालक मंडळातील सदस्यांना व त्यांचे नातेवाईक यांना दिलेल्या कर्जाची माहिती वार्षिक सभेत व वार्षिक अहवालामध्ये प्रसिध्द करणे आवश्यक असल्याने त्याचा सविस्तर तपशील पुढीलप्रमाणे.......

| अ.नं. | तपशील | ३१ मार्च, २०२६ अखेर येणे कर्ज | ३१ मार्च, २०२६ अखेर थकबाकी |
|---|---|---|---|
| १ | संचालक | ८३,२७,६९९.०० | थकबाकी नाही |
| २ | संचालक नातेवाईक | २५,०५,९११.०० | थकबाकी नाही |
| | एकूण येणे कर्ज | १,११,३३,६१०.०० | थकबाकी नाही |

३१ मार्च, २०२६ अखेर एकूण येणे कर्जाशी संचालक मंडळ व त्यांचे नातेवाईक यांच्या कर्जाचे प्रमाण १.२०% इतके आहे.

## गुंतवणूक व निधी व्यवस्थापन (Investment & Funds Management) :

पतसंस्थेने स्वीकारलेल्या ठेवीमधून कर्ज वाटप करुन शिल्लक राहिलेल्या रकमेची गुंतवणूक योग्य पध्दतीने करुन पतसंस्थेस गुंतवणूकीच्या व्याजातून जादा नफा मिळविण्यासाठी केलेले निधी व्यवस्थापन हे योग्य पध्दतीने झालेले आहे. पतसंस्थेने गुंतवणूकीबाबत स्वतंत्र गुंतवणूक धोरण (Investment Policy) तयार केली आहे. सहकार खात्याच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार, उपविधी धोरणानुसार व नियमानुसार गुंतवणूक

करणेसाठी दैनंदिन रोख तरलता (Cash Reserve Ratio) पाहून अतिरिक्त निधीची गुंतवणूक जिल्हा मध्यवर्ती बँक, शेड्युल्ड बँक व सहकारी बँक या ठिकाणी केलेली आहे. चालू वर्षी आपण पतसंस्थेस गुंतवणूक व निधी व्यवस्थापनाच्या माध्यमातून भरघोस उत्पन्न मिळविण्यात यशस्वी झालो आहोत. ३१ मार्च, २०२६ अखेर S.L.R. व Non S.L.R. गुंतवणूक रु.३९,३३,७६,४१८/- इतकी आहे. पतसंस्था स्थापनेपासून नफ्यातील तरतुदीप्रमाणे १००% गुंतवणूक ही जिल्हा मध्यवर्ती बँकेत सुरक्षित गुंतवणूक केली आहे. निधी गुंतवणूक म्हणजेच राखीव निधी व इतर निधी गुंतवणूक रु.११,२६,१८,७३०/- इतकी असून एकूण गुंतवणूक रु.५०,५९,९५,१४८/- इतकी झालेली आहे. यावरुन पतसंस्थेचा सुरक्षा प्रतिष्ठा निर्देशांक (SRI - Security Reputation Index) रु. ७८ कोटी इतका होत आहे. यावरुन पतसंस्थेची भक्कमता व सुरक्षितता सिध्द होते. पतसंस्थेने दैनंदिन रोखता (C.R.R. - Cash Reserve Ratio) व तरलता (S.L.R. - Statutory Liquidity Ratio) प्रमाण सहकार खात्याच्या निकषांनुसार राखण्यात यश प्राप्त केलेले आहे. आपल्या पतसंस्थेचे ३१ मार्च, २०२६ अखेर ३९.९२% इतके गुंतवणूकीचे प्रमाण देखील योग्य राखले आहे. कर्जावरील मिळालेल्या व्याजाबरोबरच गुंतवणूकीवर मिळालेल्या व्याजाचे उत्पन्न देखील तितकेच महत्त्वाचे आहे.

### संस्थेची नफाक्षमता (Profitability) :

नफा हा सहकारी संस्थेचे यश पाहण्याचा एकमेव निकष नाही हे खरे असले तरीही कार्यक्षमता पाहण्याच्या अनेक निकषामधील नफा हा महत्त्वाचा घटक आहे. कर्जामध्ये केलेली गुणात्मक वाढ आणि गुंतवणूक धोरणानुसार केलेली योग्य गुंतवणूक तसेच खर्चातील केलेली बचत असा त्रिवेणी संगम साधुन ३१ मार्च २०२६ अखेर सर्व तरतुदीनंतरचा रु.१,९८,९०,४८२.७२ इतका निव्वळ नफा झालेला आहे.

### नफा विभागणी (Appropriation of Profit) :

पतसंस्थेस अहवाल सालात ३१ मार्च २०२६ अखेर रु.३,२६,१५,४८७.७२ इतका ढोबळ नफा झाला.सदर ढोबळ नफ्यातून रु.१,२७,२५,००५/-इतकी थकव्याज तरतुद व इतर तरतुद करावी लागलेमुळे अहवाल सालात पतसंस्थेस रु.१,९८,९०,४८२.७२ इतका निव्वळ नफा झालेला आहे. संचालक मंडळाने पतसंस्थेचा स्वनिधी वाढावा, पतसंस्थेच्या स्थैर्यात अधिक चांगली भर व्हावी आणि सभासदांचे हीत लक्षात घेता मागील तीन वर्षे सभासदांना १२% लाभांश देणेत आला. हीच परंपरा कायम ठेवत संचालक मंडळ या वर्षी १२% लाभांशाची शिफारस करीत आहे.अहवाल सालात पतसंस्थेने चांगला नफा मिळविलेला आहे. उपलब्ध निधीची केलेली पर्याप्त व फायदेशीर गुंतवणूक, कर्जामध्ये झालेली वाढ आणि प्रभावीपणे झालेली वसुली यामुळे नफा क्षमतेत वाढ झालेली आहे. पतसंस्थेने ठेवीवरील दिलेले व्याज, एन.पी.ए. थकीत कर्जाची व्याजाची तरतुद आणि इतर आवश्यक त्या सर्व तरतुदी करुनही नफा झालेला आहे. ३१ मार्च २०२६ अखेर नफा विभागणी पुढीलप्रमाणे करण्यास संचालक मंडळाने सभेपुढे शिफारस केलेली आहे. त्यास मान्यवर सभासदांनी टाळ्यांच्या गजरात मंजुरी द्यावी ही विनंती.

| तपशील | रक्कम पैसे |
|---|---|
| मागील सालचा शिल्लक नफा-- | -- |
| दिनांक ०१/०४/२०२५ ते ३१/०३/२०२६ चा नफा | १,९८,९०,४८२.७२ |
| एकूण नफा | १,९८,९०,४८२.७२ |
| राखीव निधी २५% प्रमाणे | ४९,७२,६२१.०० |
| लाभांश वाटप १२% (प्रस्तावित) | ७७,८०,६५६.०० |
| इमारत निधी | २०,००,०००.०० |
| बुडीत कर्ज निधी | ५१,३५,०००.०० |
| शिल्लक नफा | २,२०५.७२ |

## हिशेब तपासणी (Statutory Audit) :

महाराष्ट्र सहकारी कायदा १९६० मध्ये शासन राजपत्र दिनांक १४/०२/२०१३ अन्वये वैधानिक लेखापरिक्षकाची नियुक्ती शासनाच्यावतीने होणेऐवजी संस्थेने अधिमंडळाच्या सर्वसाधारण सभेत करावयाची आहे. सदरची नियुक्ती ही शासनाने मान्यता दिलेल्या लेखापरिक्षकांचे पॅनेलमधून करावयाची आहे. त्यानुसार सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षक म्हणून दिनांक २४/०८/२०२५ रोजीच्या अधिमंडळाची सर्वसाधारण सभा क्रमांक ३४ ठराव क्रमांक ८ अन्वये अनुभवी कॉस्ट अकौंटंट मा.आर.एस.काळे अँण्ड कंपनी, सांगली यांची नियुक्ती केली असून त्यांनी २०२५-२०२६ चे वैधानिक लेखापरीक्षण पूर्ण केले आहे. त्यांनी पतसंस्थेचे हेड ऑफिस, ईश्वरपूर, शिराळा, औदुंबर व सागाव शाखांकडील वैधानिक लेखापरीक्षण केले आहे. ठेवी, कर्जे, यामधील गुणात्मक व संख्यात्मक वाढ, भांडवल पर्याप्तता, रोखता, तरलता, थकबाकी, अनुत्पादक जिंदगी, अंतर्गत नियंत्रण व कॅमल रेटींग या सर्व बाबींवर ऑडिट वर्ग निश्चित केला जातो. पतसंस्थेची प्रगती, पतसंस्थेचे कामकाज, व्यवस्थापन याबाबत समाधान व्यक्त केलेले आहे. अशा गुणात्मक बाबींवर पतसंस्थेने ऑडिट वर्ग 'अ' राखण्यात सातत्य ठेवलेले आहे. सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षासाठी ऑडिट वर्ग 'अ' देण्यात आला आहे. मा. आर.एस. काळे अँण्ड कंपनी, कॉस्ट अकौंटंट, सांगली वैधानिक लेखापरीक्षक यांनी पतसंस्थेस वेळोवेळी सूचना व मार्गदर्शन केलेने त्याचा फायदा पतसंस्थेच्या व्यवसाय वाढीस निश्चित होईल. त्यांचे व त्यांचे सहकारी यांचे मी व्यक्तिगतरित्या आभार मानतो.

## अंतर्गत तपासणी (Internal Inspection) :

पतसंस्थेचे हेड ऑफिस, शाखा ईश्वरपूर, शाखा शिराळा, शाखा औदुंबर आणि शाखा सागाव असा शाखा विस्तार झालेला आहे. शाखेकडील व्यवहारावर नियंत्रण रहाणेसाठी पतसंस्थेचे हेड ऑफिसकडील अधिकारी वर्ग आणि शाखेकडील अधिकारी वर्ग यांचेकडून सर्व शाखांची अंतर्गत तपासणी प्रत्येक महिन्यास एक शाखा याप्रमाणे शाखेकडील रोख शिल्लक, सोनेगहाण जिन्नस स्टॉक, दैनंदिन व्यवहारातील चलने, कर्ज बाँण्ड, शाखांतर्गत स्वच्छता, ग्राहकांच्या पिण्याच्या पाण्याची सोय, सूचना पेटीमधील आलेल्या सूचना, सेवक यांचेमधील समन्वय या सर्व बाबींची तपासणी करुन त्याचा अहवाल मा.संचालक मंडळ सभेमध्ये अवलोकनी घेणेसाठी ठेवणेत येत आहे. हा एक अभिनव उपक्रम मा. संस्थापक चेअरमन, प्राचार्य डॉ. पी. बी. कुलकर्णी यांच्या संकल्पनेतून साकार करण्याचा प्रयत्न पतसंस्थेकडील अधिकारी वर्ग यांच्या माध्यमातून करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला जात आहे.

## संचालक व कर्मचारी प्रशिक्षण (Training of Directors and Staff) :

सध्या सायबर गुन्हेगारी वाढल्याने ग्राहकांची भरपूर प्रमाणात फसवणूक केली जाते व आर्थिक नुकसानीस सामोरे जावे लागते. या पार्श्वभूमीवर पतसंस्था सर्व ग्राहक, संचालक मंडळ व कर्मचारी यांना प्रशिक्षण देते. पतसंस्था व्यवहार सुरक्षित कसे करावयाचे याचा ग्राहक मेळावा शाखास्तरांवर भरविते. याकरीता सर्व ग्राहकांना WhatsApp, SMS व फोनव्दारे आमंत्रित करुन याबाबत सविस्तर माहिती देते व ग्राहकांच्या शंकांचे समाधान करते. केंद्र शासन व राज्य शासन यांचेकडे स्वतंत्र सहकार मंत्रालयाची स्थापना झालेने सहकार क्षेत्रातील कायद्यांमध्ये अमुलाग्र बदल होत आहेत. पतसंस्था क्षेत्रातील नवनवीन बदल, नवीन नियम व निकष, कायद्यातील बदल या सर्वांची माहिती होणेसाठी प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित करण्यात येते यामुळे कर्मचाऱ्यांच्या कार्यक्षमतेत बदल होऊन संस्थेच्या वाढीसाठी उपयोग होतो. सहकार क्षेत्रातील अभ्यासू व संपूर्ण ज्ञान असलेल्या प्रशिक्षकांकडून पतसंस्थेचे संचालक मंडळ व कर्मचारी यांना वेळोवेळी प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित करते. पतसंस्थेने मोबाईल ॲप ही संकल्पना ग्राहकांना अत्त्याधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने सुरु केलेली आहे. यामुळे ग्राहकांना डिजिटल व्यवहार व डिजिटल व्यवहारांची सुरक्षितता याबाबत जागृती निर्माण केले जाते.

सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षामध्ये संस्थेचे स्वीकृत तज्ञ संचालक मा.श्री.यु.जी. डफळापूरकर चार्टर्ड अकौंटंट, सांगली यांचे मंगळवार दिनांक १०/०६/२०२५ रोजी सकाळी १०.३० ते दुपारी २.०० पर्यंत कर्ज विषयक कागदपत्रांची माहिती या विषयांवर संस्थेचे सर्व सेवक यांना प्रशिक्षण देण्यात आले. सदर प्रशिक्षण कार्यशाळेस संस्थेचे सर्व सेवक उपस्थित होते. या प्रशिक्षण कार्यशाळेमुळे कर्ज वितरण प्रक्रिया सुलभ व सोपी झालेली आहे.

सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षामध्ये सहकार भारती, सांगली जिल्हा (ग्रामीण), गुरुवर्य लक्ष्मणराव इनामदार सहकार प्रशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर व श्री दत्त नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित.,उरुण-ईश्वरपूर यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय सहकार दिनानिमित्त शनिवार दिनांक ०५ जुलै, २०२५ रोजी दुपारी २.३० ते दुपारी ५.३० पर्यंत वाळवा आणि शिराळा तालुक्यातील सहकारी पतसंस्थांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आले. यावेळी मा. डॉ. राजन पडवळ - समन्वयक, गुरुवर्य लक्ष्मणराव इनामदार सहकार प्रशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांनी स्ट्रॅटेजिक मॅनेजमेंट या विषयावर, मा. श्री. अमित शिंत्रे - चार्टर्ड अकौंटंट, यांनी

आयकर कायदा व पतसंस्थांच्या अडचणी या विषयावर आणि मा. श्री. विवेक सिनारे - डायरेक्टर, रिसोन्स सोल्युशन्स यांनी केंद्राची अप्रेंटीशीप योजना पतसंस्थांसाठी लाभदायक या विषयावर प्रशिक्षण दिले. सदर प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन लोकनेते राजारामबापू सेमिनार हॉल, श्रीमती कुसुमताई राजाराम पाटील कन्या महाविद्यालय, शिराळा नाका परिसर, ईश्वरपूर येथे केले होते. सदर प्रशिक्षणास पतसंस्थेचे चेअरमन, व्हा.चेअरमन, संचालक मंडळ, सर्व कर्मचारी १००% उपस्थित होते. तसेच वाळवा आणि शिराळा तालुक्यातील सहकारी पतसंस्थांमधील प्रतिनिधी उपस्थित होते.

सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षामध्ये सांगली जिल्हा सहकार बोर्ड, मार्केट यार्ड, सांगलीचे प्राचार्य मा.श्री.अरुण निवृत्ती गुजले यांचे रविवार दिनांक २४/०८/२०२५ रोजी दुपारी २.३०वाजता पतसंस्थेच्या सभासदांसाठी सभासद सहकार प्रशिक्षण या विषयांवर प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. सदर प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन लोकनेते राजारामबापू सेमिनार हॉल, श्रीमती कुसुमताई राजाराम पाटील कन्या महाविद्यालय, शिराळा नाका परिसर, ईश्वरपूर येथे केले होते. सदर प्रशिक्षणास पतसंस्थेचे ३०८ मान्यवर सभासद उपस्थित होते.

सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षामध्ये आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष २०२५ निमित्त, महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ, पुणे व जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, सांगली यांच्या संयुक्त विद्यमाने वाळवा व शिराळा तालुक्यातील सहकारी पतसंस्थांचे अधिकारी, पदाधिकारी, सेवक यांचेसाठी एक दिवसीय प्रशिक्षण गुरुवार दिनांक ०९/१०/२०२५ रोजी सकाळी १०.०० ते दुपारी ५.३० पर्यंत सायबर सिक्युरिटी, ७/१२, ८/अ, महसुली बोजा नोंदी, पतसंस्थांसाठीचे नवीन उपविधीतील ठळक तरतुदी, नवीन कर्ज धोरण, व्यवसायाच्या नवनवीन संधी, पतसंस्थांसाठी आर्थिक मापदंड व निधी, या विषयांवर बँकिंग व सहकार क्षेत्रातील तज्ञ व्याख्याते यांचे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते. सदर प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन देव सेलिब्रेशन हॉल, ईश्वरपूर-पेठ रोड (प्रांत कार्यालयाजवळ) ईश्वरपूर येथे केले होते. सदर प्रशिक्षणास पतसंस्थेचे ज्युनिअर ऑफिसर श्री. सोमनाथ मोहन वाळवेकर आणि श्री. सोनुसिंग आत्माराम थोरावडे हे उपस्थित होते.

सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षामध्ये जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, सांगली व सहकार भारती सांगली जिल्हा यांच्या संयुक्त विद्यमाने सहकारी बँका, पतसंस्था संचालिका व महिला कर्मचारी यांचेसाठी विशेष प्रशिक्षण वर्ग शनिवार दिनांक २२/११/२०२५ रोजी सकाळी १०.०० ते दुपारी ४.०० पर्यंत ओळख सहकार क्षेत्राची, महिला पतसंस्थांची निर्मिती व उद्दिष्ट, संचालक पदाची ओळख, संस्था कामकाजातील प्रभावी सहभाग, आपल्या संस्थेची सक्षमता ओळखण्याच्या विविध पध्दती, सहकारात आपले व्यक्तिमत्त्व कसे विकसित करायचे या विषयांवर सहकार क्षेत्रातील तज्ञ व्याख्याते यांचे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते. सदर प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन सांगली अर्बन को-ऑप. बँक लि., सांगली, खणभाग, वेलणकर मंगल कार्यालया जवळ, सांगली येथे केले होते. सदर प्रशिक्षणास पतसंस्थेच्या संचालिका मा.सौ. सुखदा सुमंत महाजन आणि ज्युनिअर ऑफिसर सौ. वारणा कुमार टिंगरे या उपस्थित होत्या.

महाराष्ट्र राज्य शासनाचे कलम २४ (ब) खाली महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० क्रमांक प्रशिक्षण-१०१३/सी.आर.३५/२२ सी. दिनांक १०/०९/२०१४ नुसार अधिसुचित केलेल्या महाराष्ट्र राज्य सहकारी संघ मर्या. पुणे संचलित गुलाबराव पाटील सहकार प्रशिक्षण केंद्र, सांगली यांचेवतीने दिनांक २६/०२/२०२६ ते २८/०२/२०२६ वेळ सकाळी ११.०० ते दुपारी ५.०० पर्यंत पतसंस्थेतील वसुली अधिकारी यांचेकरिता अल्पमुदत प्रशिक्षण वर्गाचे आयोजन केलेले होते. सदर प्रशिक्षणास पतसंस्थेचेवतीने १५६ चे वसुली अधिकार प्राप्त असलेले वसुली अधिकारी श्री. शशिकांत कृष्णात पिसे आणि श्री. राजेंद्रकुमार शंकरराव पाटील आणि श्री. संदीप विलासराव भोजुगडे हे उपस्थित होते.

सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षामध्ये सहकार भारती, सांगली जिल्हा (ग्रामीण), व श्री दत्त नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित.,उरुण-ईश्वरपूर यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार दिनांक २८ फेब्रुवारी, २०२६ रोजी सकाळी १०.०० ते दुपारी ५.०० पर्यंत वाळवा आणि शिराळा तालुक्यातील सहकारी पतसंस्थांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आले. यावेळी मा. डॉ. अनिल नागराळे - कार्यकारी अधिकारी, कोल्हापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स असोसिएशन यांनी कर्ज छाननी या विषयावर, मा. निवृत्त जिल्हा व सहकार न्यायाधिश ॲड.श्री.एम.एम.पोतदार यांनी सहकार कायदा या विषयावर, मा.डॉ. कबीर खराडे - कॉम्प्युटर विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांनी सायबर सिक्युरिटी व डेटा सिक्युरिटी या विषयावर आणि मा. श्री. यु.जी.डफळापूरकर-चार्टर्ड अकौंटंट, सांगली यांनी पतसंस्थांना लागु असणाऱ्या आयकर कायद्यातील तरतुदी या विषयावर प्रशिक्षण दिले. सदर प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन विश्वासराव नाईक सहकारी साखर कारखाना लि.,चिखली परिसरातील चिंतन मंडप, श्री गणेश मंदिराजवळ, चिखली येथे केले होते. या प्रशिक्षण कार्यशाळेस वाळवा व शिराळा तालुक्यातील १८ पतसंस्थांचे एकूण १५२ संचालक व सेवकवर्ग उपस्थित होता. तसेच सदर प्रशिक्षणास

पतसंस्थेचे चेअरमन, व्हा.चेअरमन, संचालक मंडळ, सर्व कर्मचारी १००% उपस्थित होते.

## सेवक वर्ग (Staff) व धनवर्धिनी एजंट (Pigmi Agents) :

सहकारातून समृध्दीकडे या ब्रीदवाक्याला अनुसरुन आपली पतसंस्था गेली ३४ वर्षे ईश्वरपूर, शिराळा, औदुंबर आणि सागाव व परिसरातील सभासद व सर्वसामान्य जनतेला आर्थिक सेवा देत आहेत.संस्थेच्या यशामागे आपला निष्ठावान सेवकवर्ग आणि कष्टाळू धनवर्धिनी प्रतिनिधी यांचे मोठे योगदान आहे. सेवक हे पतसंस्थेच्या एकत्रित प्रगती, गुणात्मक वाढ इ. बाबींवर भर देत आहेत. तसेच सर्व सेवकांचा पतसंस्थेच्या प्रगतीत व कार्यात फार मोठा वाटा आहे. पतसंस्थेने सेवकांसाठी भविष्यनिर्वाह योजना, इ.एस.आय.सी. विमा योजना, प्रशिक्षण व संरक्षण अशा बाबींकडे नेहमीच आत्मियतेने लक्ष दिले आहे. नवीन तंत्रज्ञान, सायबर क्राईमसारख्या विविध तंत्रज्ञान विषयी प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित करुन सेवक आणि धनवर्धिनी एजंट यांना प्रशिक्षित करुन त्यांचा व्यक्तिमत्त्व विकास आणि गुणात्मक वाढ करण्याचा पतसंस्थेने अटोकाट प्रयत्न केला आहे. यामुळे पतसंस्थेचे सेवक आणि धनवर्धिनी एजंट यांनी अधिक कार्यक्षमतेने विनम्र व तत्परतेने ग्राहकांची सेवा करुन सभासद व ग्राहकांशी आपुलकी व जिव्हाळ्याचे संबंध प्रस्थापित केलेले आहेत. पतसंस्थेचे कार्यलक्षी संचालक, सहाय्यक कार्यलक्षी संचालक, शाखाधिकारी, ऑफिसर, सेवक वर्ग आणि धनवर्धिनी एजंट यांनी पतसंस्थेच्या प्रगतीत सिंहाचा वाटा उचललेला आहे याचा मला व माझ्या सहकारी संचालकांना अभिमान आहे. पतसंस्थेचे सेवक आणि धनवर्धिनी एजंट यांच्या सर्वांगीण विकासासाठी पतसंस्था कटीबध्द आहे.

## कायदेशीर सल्लागार (Legal Adviser) :

संस्थेच्या कायदेशीर बाबींमध्ये मा.ॲड.अभिजीत विश्वेश्वर परमणे, मा.ॲड.सुरजसिंग तुळसीदास परदेशी, मा.ॲड. भूषण भालचंद्र देशपांडे, मा.ॲड. सतिश एन. चौगुले, मा.ॲड.कु.कविताबेन शेटे, मा.ॲड.सौ. अश्विनी सुतार, मा.ॲड.सौ. संजना यादव, मा.ॲड.योगेश सुखदेव माळी यांनी वेळोवेळी आत्मियतेने संस्थेस मौलिक मार्गदर्शन केलेबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

## सल्लागार स्थापत्य अभियंता (Consulting Civil Engineer) :

संस्थेच्या सर्वप्रकारच्या तारण घ्यावयाच्या स्थावर मालमत्तेची शासकीय दराप्रमाणे व बाजार भावाप्रमाणे अचूक किंमत करुन संस्थेस लेखी अहवाल केलेबद्दल तसेच वेळोवेळी अतियतेने मौलिक मार्गदर्शन केलेबद्दल मा. मानसिंग पाटील, मा. डी.बी.कुलकर्णी, मा. विकास शहा, मा. धनाजी शिंदे, मा. अक्षय कळसकर यांचेही आभारी आहे.

## सराफ व्हॅल्युएटर (Goldsmith / Jeweller Valuator) :

संस्थेच्या शाखा ईश्वरपूर व शाखा शिराळा येथे सोनेतारण कर्ज वितरण सुरु आहे. पतसंस्थेकडे तारण येणाऱ्या सोने जिन्नसांची कसून तपासणी करुन दैनंदिन बाजारभावाप्रमाणे बिनचूक मूल्यांकन करुन देण्याचे काम श्री. तुषार प्रकाश पेटकर, श्री. अवधुत प्रकाश पेटकर, श्री. सचिन तुळसीदास परदेशी यांनी केलेले आहे. त्यांच्या योगदानाबद्दल मी मनस्वी आभारी आहे.

## मान्यवरांच्या भेटी :

'विना सहकार नही उध्दार' आणि 'सहकारातून समृध्दीकडे' या संकल्पनेतून वाटचाल करीत असताना सांगली, सातारा व कोल्हापूर जिल्ह्यातील विशेषत: सर्व घटकांचा सर्वांगीण विकास साधणेसाठी कटिबध्द असलेल्या आदरणीय व मान्यवर व्यक्तिंनी आपुलकीने आपल्या पतसंस्थेस भेट देवून पतसंस्थेच्या कामकाजाबद्दल समाधान व्यक्त केले आणि भावी वाटचालीस मन:पूर्वक शुभेच्छा दिल्या.

मा.श्री. मनोहर पोकळे (कार्याध्यक्ष, महाराष्ट्र राज्य कृतिशील निवृत्त अधिकारी कर्मचारी संघटना, पुणे), मा.डॉ. नजीम अली कादरी (महाराष्ट्रातील प्रसिध्द नाडी तज्ञ), मा.श्री. एकनाथ उर्फ संतोष मोहन पवार (सहाय्यक शिक्षक, सुधाताई सदाशिव पाटील महाविद्यालय, ईश्वरपूर), मा. श्री. प्रकाश भरमू माणगांवकर (सेवानिवृत्त प्राध्यापक, मानसशास्त्र विभाग, श्रीमती कुसुमताई राजाराम पाटील महाविद्यालय, ईश्वरपूर), मा. डॉ. एस.एन.पाटील,(अध्यक्ष,डॉ.एस.एन.पाटील फौंडेशन, तुरुकवाडी) मा.डॉ. पंकज पाटील, मा.डॉ. प्रज्ञा पाटील (सदस्य,डॉ.एस.एन.पाटील फौंडेशन, तुरुकवाडी), मा.डॉ. एम. बी. पोतदार, मा.श्री.सुधीर रामचंद्र बंडगर (आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त), मा.सौ.वैशाली स्वप्निल आवाडे(अध्यक्षा, सहकार भारती महिला प्रमुख, महाराष्ट्र प्रदेश व उपाध्यक्षा, महाराष्ट्र अर्बन को-ऑप. बँक फेडरेशन, मुंबई), मा.श्री. मानसिंगराव नाईक (माजी आमदार व अध्यक्ष, सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.,सांगली), मा.श्री. संजय परमणे (संपर्क प्रमुख, सहकार भारती महाराष्ट्र प्रदेश),मा.डॉ. यशवंत कुलकर्णी (कार्यकारी संचालक, कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक

पांडुरंग सहकारी साखर कारखाना लि.श्रीपूर), मा.श्री. दीपक चव्हाण (माजी कार्यकारी संचालक, के.डी.सी.सी.बँक व संचालक, कोल्हापूर अर्बन को-ऑप.बँक लि., कोल्हापूर), मा.डॉ. एल.एन.घाटगे(माजी उपप्राचार्य, डी.जी.कॉलेज ऑफ कॉमर्स, सातारा), मा.डॉ. एस.एम.भोसले (प्राचार्य, श्रीमंत बाबासाहेब देशमुख महाविद्यालय, आटपाडी),मा.डॉ. अनिलकुमार वावरे(अर्थशास्त्र विभाग प्रमुख, छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा), मा.श्री. विनायक जगताप (प्रमुख, राष्ट्रीय योग संमेलन, योग विद्या गुरुकुल, तळवाडे), मा.श्री. रावसाहेब चव्हाण (आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त), मा.डॉ. दुष्यंत अशोकराव रावराणे (असिस्टंट प्रोफेसर, वसंतदादा पाटील आयुर्वेदिक मेडिकल कॉलेज अँण्ड इन्स्टिट्युट ऑफ योगा, सांगली), मा.डॉ. सौ. सोनाली रणजित पाटील (आयुर्वेद, विद्यावाचस्पती), मा.सौ.प्रेरणा प्रसाद जंगम (होराप्रवीण, ज्योतिष विशारद, ज्योतिषभास्कर), मा.श्रीमती निलिमा महेश आमोणकर, मा.प्रा.संजय ठिगळे(अध्यक्ष, शिवाजी युनिव्हर्सिटी इकॉनॉमिक्स असोसिएशन, कोल्हापूर), मा.डॉ.कालिदास पाटील (सचिव, महाराष्ट्र राज्य मानसशास्त्र परिषद), मा.डॉ.लता ऐवळे-कदम (मराठी कवितेतील कृषि जाणिवांचा चिकित्सक अभ्यास, विद्यावाचस्पती), मा.श्री.शशिकांत राजोबा (महासचिव, महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन, पुणे), मा.श्री.जवाहर दौलतराव छाबडा (सहसंघटक, सहकार भारती, महाराष्ट्र प्रदेश, कोल्हापूर विभाग) या सर्व मान्यवरांचे मी मन:पूर्वक आभार मानतो.

## आभार व समारोप :

आपल्या श्री दत्त नागरी पतसंस्थेचे सन २०२५-२०२६आर्थिक वर्ष सर्वांच्या सहकार्याने यशस्वी झाले याबद्दल आम्ही कृतज्ञ आहोत. सभासद, ठेवीदार, बंधू-भगिनी यांनी संस्थेवर दाखवलेल्या अढळ विश्वासामुळेच आज संस्था प्रगतीपथावर आहे. कर्जदार सभासद यांनी घेतलेल्या कर्जाचे हप्ते नियमित भरुन संस्थेच्या आर्थिक शिस्तीस हातभार लावला. मा.संचालक मंडळ यांनी वर्षभर मार्गदर्शन करुन, धोरणात्मक निर्णय घेऊन संस्थेला योग्य दिशा दिली. पतसंस्थेच्या वाटचालीस प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष सहकार्य करणाऱ्या व्यक्ती, सहकार खाते, संस्थेच्या उपक्रमास लोकाभिमुख करणारी प्रसिध्दी माध्यमे आणि त्यांचे प्रतिनिधी यांचे याप्रसंगी आभार. पतसंस्थेचे संस्थापक चेअरमन, संचालक, प्रधान शाखा प्रमुख, ईश्वरपूर शाखा प्रमुख, शिराळा शाखा प्रमुख, सागाव शाखा प्रमुख, सेवकवर्ग व धनवर्धिनी एजंट यांनी आपला संपूर्ण वेळ पतसंस्थेशी प्रामाणिक राहून विनम्र व तत्परतेने ग्राहकाभिमुख सेवा दिली. मा. सहकार आयुक्त, मा. जिल्हा उपनिबंधक, मा. सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, लेखापरीक्षक व विविध क्षेत्रातील शासकीय अधिकारी यांचेकडून मिळालेले मार्गदर्शन व सहकार्य अत्यंत मोलाचे ठरले आहे. या सर्वांच्या मोलाच्या सहकार्याने यावर्षी आपल्या पतसंस्थेने अहवाल सालात लक्षणीय असे यश प्राप्त केले आहे.या यशाच्या पार्श्वभूमीवर आगामी येणाऱ्या वर्षामध्ये आपण यापेक्षा अधिक प्रमाणात प्रगती करु शकू अशी आम्हाला खात्री वाटते. आपल्या पतसंस्थेस प्राप्त झालेले यश हे आपणा सर्वांचे एकत्रित प्रयत्नांचे व सहकार्याचे फलित आहे याची कृतज्ञतापूर्वक जाणीव आम्हाला आहे. आपण सर्वांनी भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या याबद्दल मी त्यांचे मन:पूर्वक आभार मानतो.

'सहकारातून समृध्दीकडे' या मार्गावर चालताना सन २०२५-२०२६ मध्ये संस्थेने ठेवी, कर्जे, वसुली व नफा या सर्वच आघाड्यांवर समाधानकारक प्रगती केली आहे. ही प्रगती म्हणजे सभासदांचा विश्वास, संचालक मंडळाचे धोरण, सेवकांचे परिश्रम व धनवर्धिनी प्रतिनिधींची निष्ठा यांचा एकत्रित परिणाम आहे. डिजीटल बँकिंग, सायबर सुरक्षा, स्पर्धा, वाढते नियम अशी अनेक आव्हाने पुढील काळात आहेत. ही आव्हाने पेलण्यासाठी ग्राहक प्रथम हा मंत्र घेऊन तंत्रज्ञान आत्मसात करत आहे. मोबाईल बँकिंग, युपीआय, कोअर बँकिंग अपग्रेडेशन या माध्यमातून अधिक सुरक्षित व जलद सेवा देण्याचा आमचा संकल्प आहे. यापुढे आपणा सर्वांचेकडून अशाच सहकार्याची अपेक्षा व्यक्त करतो. संस्थेच्या नावलौकिकात भर पडो अशी अपेक्षा व्यक्त करुन संस्थेचा ३१ मार्च २०२६ चा ३५ वा वार्षिक अहवाल, ताळेबंद, नफातोटापत्रक, नफा विभागणी आणि सन २०२६-२०२७ चे अंदाजपत्रक आपणापुढे मंजुरीसाठी सादर करीत आहे त्यावर सविस्तर चर्चा करुन मंजुरी द्यावी ही नम्र विनंती.

धन्यवाद....!

जय हिंद....! जय महाराष्ट्र.....! जय सहकार......!

चेअरमन
**मा. प्रा.डॉ. श्रीकांत भानुदास चव्हाण**
एम.ए., पीएच.डी.

## Balance Sheet Ason
## ताळेबंद पत्रक

| रक्कम 31/03/2025 अखेर | Capital & Liabilities भागभांडवल व देणी | रक्कम 31/03/2026 अखेर | रक्कम 31/03/2026 अखेर |
|---|---|---|---|
| **7,50,00,000.00** | **Authorised Share Capital**<br>**अधिकृत भागभांडवल** | | **10,00,00,000.00** |
| **6,31,29,700.00** | **Paid Up Share Capital**<br>**वसूल भागभांडवल** | | **6,67,67,800.00** |
| 6,31,29,700.00 | A Class Member<br>अ वर्ग सभासद | 6,67,67,800.00 | |
| **12,37,80,411.26** | **Reserve Fund & Other Reserve**<br>**गंगाजळी व इतर निधी** | | **13,72,84,009.27** |
| 2,89,63,897.00 | Reserve Fund<br>राखीव निधी | 3,32,22,190.00 | |
| 31,91,160.67 | Dividend Equilisation Fund<br>डिव्हीडंड इक्वि. निधी | 35,35,965.68 | |
| 22,59,051.00 | Standard Asstes Provision<br>उत्तम जिंदगी तरतूद | 22,59,051.00 | |
| 3,13,83,342.00 | Building Fund<br>इमारत निधी | 3,33,83,842.00 | |
| 37,74,000.00 | Investment Fluctuation Fund<br>गुंतवणूक चढ उतार निधी | 37,74,000.00 | |
| 5,00,57,859.59 | Bad & Doubtful Debts Fund<br>बुडीत कर्ज निधी | 5,57,57,859.59 | |
| 19,00,000.00 | Technology Development Fund<br>तंत्रज्ञान विकास निधी | 24,00,000,00 | |
| 1,60,000.00 | Charity Fund<br>धर्मादाय निधी | 1,60,000.00 | |

## 31/03/2026 as on
## ३१/०३/२०२६ अखेर

| रक्कम 31/03/2025 अखेर | Assets & Properties मालमत्ता व येणी | रक्कम 31/03/2026 अखेर | रक्कम 31/03/2026 अखेर |
|---|---|---|---|
| **1,86,35,161.82** | **Cash in Hand, Balance with Bank हातातली व बँक शिल्लक** | | **2,61,30,369.49** |
| 22,66,823.00 | Cash in Hand अखेरची शिल्लक | 30,76,721.00 | |
| 36,86,334.44 | DCC Bank Current सां.जि.म. बँक (करंट) | 2,57,196.04 | |
| 2,87,570.97 | Sangli Urban Islampur Current सांगली अर्बन इस्लामपूर (करंट) | 66,589.57 | |
| 4,85,685.31 | Sangli Urban Shirala Current सांगली अर्बन शिराळा (करंट) | 1,84,487.81 | |
| 1,790.92 | Rajarambapu Bank Islampur Current राजारामबापू बँक इस्लामपूर (करंट) | 1,790.92 | |
| 45,537.00 | Lord Balaji Bank Current लॉर्ड बालाजी (करंट) | 45,537.00 | |
| 2,03,329.00 | Palus Bank Islampur Current पलूस सह. बँक इस्लामपूर (करंट) | 6,48,952.60 | |
| 6,65,780.73 | Rajarambapu Sah. Bank Shirala Current राजारामबापू बँक शिराळा (करंट) | 3,45,616.59 | |
| 2,56,990.67 | DCC Bank Shirala Current सां.जि.म. बँक शिराळा (करंट) | 4,54,414.87 | |
| 38,703.00 | The Karad Urban Coop Bank Ltd. Karad Current दि कराड अर्बन को-ऑप. बँक (करंट) | 1,18,559.00 | |
| 6,251.40 | Apana Sah. Bank Islampur Current अपना सहकारी बँक इस्लामपूर (करंट) | 5,803.00 | |

## Balance Sheet Ason
## ताळेबंद पत्रक

| रक्कम 31/03/2025 अखेर | Capital & Liabilities भागभांडवल व देणी | रक्कम 31/03/2026 अखेर | रक्कम 31/03/2026 अखेर |
|---|---|---|---|
| 1,61,054.00 | Staff Welfare Fund<br>कर्मचारी कल्याण निधी | 1,61,054.00 | |
| 5,50,000.00 | Member Welfare Fund<br>सभासद कल्याण निधी | 5,50,000.00 | |
| 2,00,000.00 | Cooperative Training Fund<br>सहकार प्रशिक्षण निधी | 2,00,000.00 | |
| 11,80,047.00 | Capital Fund Reserve<br>भांडवल निधी रिझर्व्ह | 11,80,047.00 | |
| 0.00 | Building Repair & Maintainance Fund<br>इमारत दुरुस्ती व देखभाल | 5,00,000.00 | |
| 0.00 | Choudashakpurti Fund<br>चौदशकपूर्ती निधी | 2,00,000.00 | |
| **118,29,65,003.36** | **Deposits<br>ठेवी** | | **126,74,92,992.88** |
| 85,66,20,405.00 | Fixed Deposit<br>मुदत ठेव | 93,89,13,055.00 | |
| 1,12,80,100.00 | Recurring Deposit<br>रिकरिंग ठेव | 1,11,59,900,.00 | |
| 1,57,19,639.00 | Damduppat Deposit<br>दामदुप्पट ठेव | 1,85,12,189.00 | |
| 28,910.00 | Trimurti Deposit<br>त्रिमुर्ती ठेव | 28,910.00 | |
| 8,24,05,243.60 | Saving Deposit<br>सेव्हिंग ठेव | 9,11,92,924.12 | |
| 4,50,72,311.00 | Pigmi Deposit<br>धनवर्धिनी ठेव | 3,36,45,743.00 | |

31/03/2026 as on

३१/०३/२०२६ अखेर

| रक्कम 31/03/2025 अखेर | Assets & Properties मालमत्ता व येणी | रक्कम 31/03/2026 अखेर | रक्कम 31/03/2026 अखेर |
|---|---|---|---|
| 86,207.45 | Union Bank of India Islampur Current<br>युनियन बँक ऑफ इंडिया इस्लामपूर (करंट) | 33,343.13 | |
